Volume - 6 (2025)
Special Issue - 1 (March)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN
2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महाड चवदार तळे सत्याग्रह

**सुजाता जनार्धन कांबळे**
संशोधक, राज्यशास्त्र विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
Email id – sjk130984@gmail.com
Mob.- 9404122355

**डॉ. प्रवीण भागडीकर**
मार्गदर्शक
अण्णासाहेब गुंडेवार कॉलेज, नागपूर

---

***सारांश :***

*महाड येथील चवदार तळे सत्याग्रह हा जगाच्या इतिहासातील पाणी पिण्याचा हक्क मिळवण्यासाठी सर्वाधिक काळ चाललेला सत्याग्रह आहे.*

*भारतात चातुर्वण्य पद्धती आहे. ब्राह्मण,क्षत्रिय, वैश्य, शूद्र या वर्णांच्या अंतर्गत अनेक जाती आहेत. शूद्र वर्गातील लढवय्या परंतु हीन मानल्या गेलेल्या जातींना 'अस्पृश्य' म्हणून हिनवले जात होते व त्यांना सार्वजनिक ठिकाणी वावरण्यास, शिक्षण घेण्यास, शस्त्र धारण करण्याचे अधिकार 'मनुस्मृति' नामक हिंदू धर्मग्रंथाने नाकारले होते.*

*एक मानवी समूह दुसऱ्या मानवी समूहावर किती अनन्वित अत्याचार व शोषण हजारो वर्षांपासून करीत होता त्याचे जिवंत उदाहरण म्हणजे भारतात प्रचलित असलेली अस्पृश्यता. ही अस्पृश्यता नष्ट करून अस्पृश्य हे सुद्धा इतर मानवांप्रमाणे माणसे असून त्यांना मानवी हक्क मिळवून देण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनेक कृतींपैकी एक कृती म्हणजे महाड येथील चवदार तळ्यावर पाणी पिण्याच्या हक्कासाठी 20 मार्च 1927 रोजी केलेल्या सत्याग्रह होय.*

---

**प्रस्तावना :**

'गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो पेटून उठतो' अशा विचाराने डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दलित, पिचलेल्या लोकांमध्ये क्रांतीची ज्योत लावली. आत्मभानाची मशाल पेटवली.

'शंभर वर्षे शेळी होऊन जगण्यापेक्षा एकच दिवस जगा परंतु वाघासारखे जगा'. हा महामंत्र अस्पृश्य समाजाला त्यांनी दिला. बाबासाहेबांच्या या विचाराने हजारो वर्षे अंधकारात व अज्ञानाच्या खाईत लोटलेला समाज खडबडून जागा झाला. व आपल्या हक्कांविषयी बोलू लागला. बाबासाहेबांच्या एका हाकेला ओ देऊन हा समाज हजारो वर्षांची गुलामगिरी, अस्पृश्यता, जातीयता नष्ट करायला पुढे सरसावला.

आपण जर हिंदू आहोत तर इतर स्पृश्य हिंदू सारखे आपण पानवठ्याला स्पर्श का करू शकत नाही? जातीप्रथा ही दैवनिर्मित आहेत तर मग आपल्याच लेकरांमध्ये ईश्वर भेदभाव का करतो? असे प्रश्न तो स्वतःशी विचारू लागला.

आत्मभान जागृत झालेला अस्पृश्य समाज डॉ. आंबेडकर यांच्या खांद्याला खांदा लावून महाड चवदार तळे सत्याग्रहात उतरतो व लढा यशस्वी करतो. मी सुद्धा इतर स्पृश्य हिंदू प्रमाणेच माणूस असून मलाही अधिकार आहेत हे सिद्ध करतो.

भारतीय स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण झाल्यानंतरही आजही भारतातील उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, तामिळनाडू, यांसारख्या राज्यात अस्पृश्यता पाळली जाते. दलितांना पिण्याच्या पाण्याला हात लावला म्हणून मारहाण केली जाते. यावरून महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाचे ऐतिहासिक, सामाजिक महत्त्व लक्षात येते.

**बीज सज्ञा :** अस्पृश्यता, मनुस्मृति, मानवी हक्क, अहिंसात्मक सत्याग्रह

**गृहीतके :**

1. स्पृश्य लोक अस्पृश्यांना हिन वागणूक देत.
2. अस्पृश्यांना धर्मसंस्थेने व धार्मिक ग्रंथांनी मानवी हक्क नाकारले होते.
3. मनुस्मृतीने मानवा मानवात विषमता व भेद निर्माण केला होता.

**उद्दिष्टे :**

1. डॉ. आंबेडकरांनी शांततामय मार्गाने केलेल्या चवदार तळे सत्याग्रहाचे महत्त्व विशद करणे.
2. भारतीय राज्यघटना लागू होण्यापूर्वी भारतीय समाजात त स्पृश्य- अस्पृश्यता किती मोठ्या प्रमाणावर पाळली जात होती हे स्पष्ट करणे.
3. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा लढा स्वाभिमानाने व आत्मसन्मानाने जीवन जगण्यासाठी केलेला संघर्ष आहे हे स्पष्ट करणे.
4. सर्व माणसे जन्मतःच समान आहेत हे सिद्ध करणे.

**भारतातील जातीव्यवस्था :**

भारतात हिंदू समाजात शूद्र वर्णांतर्गत हजारो जाती आहेत. या जातींचा उगम ऋग्वेदातील 10 ऋचेतील 9 कडव्यातील11 व 12 बारा श्लोकानुसार चातुर्वण्याची निर्मिती झालेली आहे.

हिंदू समाजात उच्चनीचता मोठ्या प्रमाणात आढळते त्यांच्यात रोटीबंदी, बेटीबंदी व भेटीबंदी आहे. खालच्या समजल्या जाणाऱ्या जातींना उच्चवर्णीयांनी जगण्याचे मानवी हक्क सुद्धा नाकारले होते. व त्यांना समाजातून बहिष्कृत म्हणजे बाहेर काढलेले होते.

अस्पृश्यांची घरे गावाच्या बाहेर होती.त्यांना शिक्षण घेण्याचा, शस्त्र धारण करण्याचा, सार्वजनिक ठिकाणे जसे न्यायालये,पाणवठे,उपहारगृहे उद्याने ,यांचा वापर करण्याची परवानगी नव्हती.हजारो वर्षे ही व्यवस्था कायम होती.

**वसाहतीच्या राज्यातील अस्पृश्यांची स्थिती :**

इंग्रज भारताचे राज्यकर्ते झाल्यानंतर इंग्रजांनी काही प्रमाणात सामाजिक सुधारणा करण्याचा प्रयत्न

केला. सती प्रथा,बालविवाह प्रथा यांसारख्या अनिष्ट रूढी त्यांनी बंद केल्या. परंतु अस्पृश्यता मात्र तशीच पाळली जात होती. अस्पृश्यांच्या स्थितीत सुधारणा करण्याबाबत ब्रिटिश सरकारने कोणतीही पावले उचलली नव्हती.

तरीही इंग्रजी शिक्षणाच्या प्रभावाने भारतीय समाजात प्रबोधनात्मक विचारांचा प्रसार झाला. भारतातील महात्मा फुले,आगरकर, लोकहितवादी, पंडिता रमाबाई, राजा राममोहन राय यांनी भारतीय समाजातील अनिष्ट प्रथा- परंपरा व अस्पृश्यता, स्त्रियांची परिस्थिती यांकडे सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

**रावबहादुर सी. के. बोले यांनी मांडलेला ठराव :**

मुंबई विधिमंडळाची एक सदस्य रावबहादुर सी.के. बोले यांनी 4 ऑगस्ट 1927 रोजी अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठे,दवाखाने, शाळा, न्यायालये, उद्याने खुली करण्यात येत असल्याचा ठराव मंजूर करून घेतला. त्यानुसार मुंबई प्रांतातील सर्व नगरपालिका, महानगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था यांना या ठरावाचे अंमलबजावणी करणे बंधनकारक होते. त्यानुसार महाड नगरपालिकेने चवदार तळे अस्पृश्यांसाठी ठराव करून खुला केला होता परंतु अस्पृश्य लोक स्पृश्य लोकांच्या भीतीपोटी पाणी भरण्यास जात नव्हते.

**डॉ. आंबेडकरांची चवदार तळे सत्याग्रहाची घोषणा :**

अस्पृश्यांच्या मनातील भीती घालविण्यासाठी व आम्हीही माणसेच असून इतर धर्मीय लोकांप्रमाणेच आम्हालाही अधिकार आहेत हे सिद्ध करण्यासाठी डॉ.आंबेडकर व त्यांचे स्पृश्य तसेच अस्पृश्य सहकारी अनंतराव चित्रे,संभाजी तुकाराम गायकवाड, महाड नगरपालिकेचे नगराध्यक्ष सुरबा नाना टिपणीस, महाच्या पुरोगामी विचाराचे शंकर भाई धारिया, बापूसाहेब सहस्त्रबुद्धे, शिवराम जाधव, सुभेदार संवादकर, बाळाराम आंबेडकर, पा.न. राजभोज, शिवतकर यांसारख्या कार्यकर्त्यांच्या साक्षीने 19 व 20 मार्च 1927 रोजी महाड येथील चवदार तळ्यावर पाणी पिण्याचा हक्क बजावणार आहोत असे जाहीर केले.

**बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना :**

बाबासाहेबांनी समाजात जागृती निर्माण करण्यासाठी 20 जुलै 1924 रोजी बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली. 'शिका, संघटित व्हा व चळवळ करा' हे या संघटनेचे ध्येय होते. बहिष्कृत समाजातील लोकांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन देणे, स्वतःच्या हक्कांविषयी जाणीव निर्माण करणे ही या संस्थेची महत्त्वाची उद्दिष्टे होती.

**डॉ.आंबेडकर यांच्या नेतृत्वात चवदार तळे सत्याग्रह :**

या सत्याग्रहात मुंबई कोकण नागपूर नांदेड येथून सुमारे तीन हजार लोक जमले होते. महाड येथील विश्वेश्वर मंदिराच्या बाजूच्या मोकळ्या जागेवर आंदोलनकर्त्यांसाठी राहण्याची व भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली होती. या परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर स्वागताध्यक्ष संभाजी गायकवाड होते. या परिषदेत सुमारे 33 ठराव दिनांक 19 मार्च 1927 रोजी मंजूर करण्यात आले.

**चवदार तळ्याचे पाणी प्राशन :**

20 मार्च 1927 रोजी परिषदेच्या दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे डॉ.आंबेडकर यांनी समारोपाची भाषण केले. ते म्हणाले की चवदार तळ्याचे पाणी प्राशन केले म्हणजे आम्ही अमर होणार नाही किंवा आजपर्यंत आम्ही ते प्राशन केले नाही म्हणून आम्ही मेलो नाही. इतर धर्मियांनी, जनावरांनी गाईगुरांनी चवदार तळ्याचे पाणी पिले तर ते बाटत नाही परंतु अस्पृश्यांनी पाणी पिले तर तळे बाटते हा शुद्ध भेदाभेद आहे.



हा भेदाभेद नष्ट करण्यासाठी व स्पृश्य लोकांप्रमाणेच आम्हीही माणसे असून आम्हालाही मानवी हक्क आहेत हे सिद्ध करण्यासाठी आम्ही तळ्यावर पाणी पिणार आहोत. यानंतर शिवराम जाधव यांनी आभार प्रदर्शन केले. त्यानंतर ठरल्याप्रमाणे शांततामय मार्गाने परिषदेतील सर्व सत्याग्रही व व्यासपीठावरील सर्व व्यक्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात चवदार तळ्यावर गेली. सर्वप्रथम डॉक्टर आंबेडकर यांनी ओंजळीने तळ्याचे पाणी प्राशन केले व त्यांचे अनुकरण इतर सर्व सत्याग्रहींनी केले.

**स्पृश्य हिंदूंचा हल्ला व तळे शुद्धीकरण :**

डॉ. आंबेडकर व इतर अस्पृश्यांनी चवदार तळ्यावर पाणी पिले ही घटना वाऱ्यासारखी महाडमध्ये पसरली. सनातनी स्पृश्य लोकांनी अफवा उडवली की डॉ.आंबेडकर महाड मधील विश्वेश्वर मंदिरात प्रवेश करणार आहेत. त्यामुळे इतर स्पृश्य हिंदू चांगले संतापले. लाट्या काठ्या घेऊन ते सत्याग्रहींच्या राहण्याच्या ठिकाणी आले व सत्याग्रही लोकांना मारहाण केली त्यांच्या अन्नात माती कालवली.

दुसऱ्या दिवशी 21 मार्च 1924 रोजी तळ्यामध्ये पंचगव्य म्हणजे गाईचे शेण,मूत्र, दूध, दही, तूप यांचे मिश्रण 108 घागरी भरून तळ्यात टाकले व तळे शुद्धीकरण केले. मुळात ते शुद्धीकरणाच्या नावाखाली आणखीच दूषित करण्यात आले.

बाबासाहेबांनी सत्याग्रहींना शांतपणे आपापल्या गावी जाण्याचा सल्ला दिला. संभाजी गायकवाड यांचा तरुण मुलगा भिकाजी याला या हल्ल्यात चांगलाच मुका मार बसला व कालांतराने त्याचे निधन झाले.

**बहिष्कृत भारत पाक्षीकाची सुरुवात :**

महाडच्या परिषदेनंतर डॉ. आंबेडकर यांनी 'बहिष्कृत भारत' नावाचे पाक्षिक 1927 मध्येसुरू केले. या पाक्षिकाच्या माध्यमातून समाज जागृती व विरोधकांच्या मताचे खंडन करण्यात येत होते. तर्कशुद्ध विचार व्यक्त करून समतेच्या हक्कासाठी लढण्याचे धैर्य अस्पृश्य समाजात निर्माण केले जात होते.

**महाड नगरपालिकेचा तळे खुले करण्याचा ठराव मागे :**

4 ऑगस्ट 1927 रोजी महाड नगरपालिकेने ज्या ठरावानुसार तळे अस्पृश्यांसाठी खुले केले होते तो ठराव

मागे घेतला. व अस्पृश्यांना चवदार तळ्यावर पाणी भरण्यास मज्जाव केला.

**महाडच्या दुसऱ्या परिषदेपूर्वी घडलेल्या काही महत्त्वाच्या घटना :**

महाड नगरपालिकेने तळे खुले केल्याचा ठराव मागे घेतला जो की बेकायदेशीर होता त्यामुळे बाबासाहेबांनी पुन्हा महाड येथे सत्याग्रह करायचे ठरविले. व 25, 26 ,27 डिसेंबर 1927 ह्या तारखा निश्चित केल्या.

महाडचा दुसरा सत्याग्रह करण्यापूर्वी काही महत्त्वाच्या घटना घडल्या त्या अशा-

1. डॉ. आंबेडकरांनी समता सैनिक दलाची स्थापना केली.
2. स्पृश्य सनातनी लोकांनी कुलाबा जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन सत्याग्रहावर बंदी घालण्याची मागणी केली.
3. महाड येथील सनातन्यांनी डॉ.आंबेडकर, सीतावत शिवतकर, कृष्णा महार व गण्या चांभार यांच्यावर 12 डिसेंबर 1927 रोजी न्यायालयात फिर्याद केली.
4. 'अस्पृश्यांनी चवदार तळ्यावर जाऊन पाणी पिऊ नये' अशी सूचना न्यायालयाने द्यावी अशी फिर्याद स्पृश्य हिंदूंनी दिवाणी न्यायालयात केली.
5. 14 डिसेंबर 1927 रोजी न्यायाधीश वैद्य यांनी आपले आज्ञापत्र सादर केले व त्या आज्ञापत्रात असे म्हटले की न्यायालयाचे दुसरे आज्ञापत्र येईपर्यंत सर्व अस्पृश्यांनी किंवा त्यांच्या वतीने कोणीही चवदार तळ्यावर पाणी पिऊ नये.

1. 6.स्थानिक व्यापाऱ्यांनी परिषदेवर व कार्यकर्त्यांवर बहिष्कार टाकून त्यांना अन्नधान्य व इतर सामग्री न विकण्याचे ठरविले होते.

6. परिषदेसाठी जागा मिळू द्यायची नाही असे ठरविले होते.
7. कुलाबा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हुड यांनी सत्याग्रह न करण्याबद्दल बजावले होते.
8. महाड चवदार तळ्याच्या भोवती पोलिसांचा सक्त पहारा होता व परिसरात संचारबंदी लागू करण्यात आली.

**महाडचा दुसरा सत्याग्रह :**

डॉक्टर बाबासाहेब हे स्वतः बॅरिस्टर व कायद्याची पंडित होते मुंबई विधिमंडळाने अस्पृश्यांसाठी सार्वजनिक ठिकाणी मुक्त केल्याच्या ठरावाविरुद्ध स्थानिक न्यायालय, सरकार व स्थानिक प्रशासन नियमबाह्य वागत होते. डॉ. आंबेडकरांना शांततामय मार्गाने व कायद्याच्या अधीन राहून लढाई लढाईची होती 25 डिसेंबर 1927 ला आठ ते दहा हजार सत्याग्रही जमा झाले.

डॉक्टर आंबेडकरांनी त्यांच्यासमोर ऐतिहासिक भाषण दिले व आपला लढा हा सरकार विरुद्ध नसून विषमता नष्ट करून हिंदू समाजाची रचना समता तत्वावर उभारण्यासाठी आहे असे जाहीर केले.डॉ आंबेडकर यांनी या सत्याग्रहात ची तुलना 5 मे 1789 रोजी व्हर्साय येथील फ्रेंच लोकांच्या क्रांतिकारक राष्ट्रीय सभे बरोबर

केली.

**मनुस्मृति दहनाचा ठराव व मनुस्मृतीचे दहन :**

25 डिसेंबर 1927 रोजी च्या परिषदेत अनेक ठराव संमत करण्यात आले. बापूसाहेब सहस्त्रबुद्धे यांनी मनुस्मृति दहनाचा प्रस्ताव मांडला. त्यानुसार मनुस्मृतीतील काही उतारे वाचून उतारांची पाने फाडून बापूसाहेब सहस्त्रबुद्धे व अस्पृश्य साधूंच्या हस्ते यज्ञविधीत मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. या घटनेने संपूर्ण भारतात खळबळ उडाली. भारताच्या सामाजिक चळवळीच्या इतिहासात 25 डिसेंबर 1927 हा दिवस 'मनुस्मृति दहन दिन' व 'स्त्री मुक्ती दिन' म्हणून कायमचा कोरला गेला

26 डिसेंबर 1927 रोजी दुपारी जिल्हाधिकारी होळी यांनी परिषदेला भेट दिली व न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत सत्याग्रह न करण्याबद्दल सांगितले.

तिसऱ्या दिवशी 27 डिसेंबर 1927 रोजी डॉक्टर आंबेडकर यांनी सत्याग्रह कोबीचा ठराव परिषदेपुढे मांडला व आपला लढा सरकार विरुद्ध नसून स्पृश्य हिंदूंच्या विरुद्ध आहे. मूलभूत हक्कांसाठी आणि समतेसाठी आपल्याला लढा आहे असे जाहीर केले.

**सत्याग्रहींची मिरवणूक :**

सत्याग्रहींनी महाड शहरातून शांततामय मार्गाने हातात फलक घेऊन व जयघोष करीत मिरवणूक काढली. व चवदार तळ्याला वळसा घालून पुन्हा ते परिषदेच्या मंडपात आले.

**स्त्रियांविषयी गौरवोद्गार :**

सत्याग्रहात सामील झालेल्या स्त्रियांबद्दल डॉ. आंबेडकरांनी गौरव उद्गार काढले. अस्पृश्य स्त्रियांमध्ये फार धैर्य व धमक आहे जी ब्राह्मण स्त्रियांमध्ये पाहायला मिळत नाही. अस्पृश्यतेचा कलंक नष्ट काढण्यासाठी पुरुषांबरोबरच स्त्रियांनी सुद्धा निश्चय करावा, स्त्रियांना स्वच्छ राहण्याबद्दल व शिक्षण घेण्याबद्दल त्यांनी सल्ला दिला. अशाप्रकारे 27 डिसेंबर 1927 रोजी महाड येथील दुसरी परिषद समाप्त झाली.

**न्यायालयाचा निकाल :**

20 मार्च 1927 ते 27 डिसेंबर 1927 पर्यंत डॉ. आंबेडकरांनी चालविलेल्या महाड सत्याग्रहाचा निकाल डॉ.आंबेडकरांच्या बाजूने लागला.व जस्टिस ब्रूम्सफिल्ड यांनी महाड चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले होत असल्याचा निर्वाळा दिला.

**समारोप :**

4 ऑगस्ट 1923 ते 27 डिसेंबर 1927 या जवळपास सव्वा चार वर्षे सार्वजनिक पाणवठ्यांवर पाणी पिण्याच्या हक्क अस्पृश्यांना मिळावा यासाठी चाललेल्या आंदोलनाला आणि कायदेशीर लढाईला बाबासाहेबांना व त्यांना तन-मन- धनाने सहकार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांना यश आले. ही घटना

जगाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वपूर्ण घटना आहे या सत्याग्रहामुळे अस्पृश्य समाजात नवीन चेतना,आत्मविश्वास व स्वाभिमानाची वृत्ती निर्माण झाली. हक्क व स्वातंत्र्य हे भीक मागून नाही तर संघर्ष करूनच मिळवावे लागतात ही गोष्ट पुन्हा अधोरेखित झाली.

पाण्यासाठी सर्वाधिक काळ चाललेला हा सत्याग्रह होता या सत्याग्रहाच्या माध्यमातून डॉक्टर आंबेडकरांमधील निर्भयता, नेतृत्वगुण,विद्वत्ता, या गुणांचे दर्शन झाले. तसेच शांती व अहिंसेवरील त्यांची निष्ठा अधोरेखित झाली. शिक्षणाचे महत्त्व प्रत्यक्ष कृतीतून डॉक्टर आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाला पटवून दिले. त्यामुळे अस्पृश्याने शिक्षण घेण्यास आणि आपला आर्थिक, सामाजिक दर्जा सुधारण्यास सुरुवात केली.

महाडचा चवदार तळे सत्याग्रह हा भावी पिढ्यांना त्यांच्या आयुष्यात जो कोणता वैयक्तिक अथवा सामूहिक सामाजिक, आर्थिक, राजकीय, न्यायालयीन संघर्ष करावा लागेल त्यासाठी एक मार्गदर्शक म्हणून मैलाचा दगड आहे.

**संदर्भ :**


- Omvedt, Dr. Gail. 2011. Building the Ambedkar Revolution. Bhashya Prakashan. P. 25 to 67.
- Editor : Dr. Ambedkar as a Nation Builder, Vol.ll. P. 79.
- ibid., P. 80
- ibid., P. 165
- ibid., P. 166
- Ibid., P. 167
- https://youtu.be/ZVLNw6W6JYQ?si=E4ZYF1IPPMJp3iS